जनमानसाचा निडर आवाज...
# पुणे प्राईम न्यूज
मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक २५२ | शनिवार, ११ एप्रिल २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210

BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure, Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER

# पिंपरी-चिंचवडकरांना प्रदूषण मुक्त पाणी पुरवण्यास फस्ट प्रायोरिटी

**पिंपरी-चिंचवड, ता. १० :** पिंपरी-चिंचवड शहराच्या जीवनवाहिन्या ठरलेल्या पवना आणि इंद्रायणी नद्यांतील वाढत्या प्रदूषणामुळे शहरवासीयांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे तात्काळ आणि दीर्घकालीन उपाययोजना करण्यासाठी राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी शहराचा दौरा केला. तसेच, इंद्रायणी नदीवरील निघोजे बंधाऱ्याची प्रत्यक्ष पाहणी केली.



पवना आणि इंद्रायणी नद्यांमध्ये शहरी व औद्योगिक सांडपाणी थेट मिसळत असल्याने पाणी अत्यंत दूषित झाले आहे. या पाण्यात आरोग्यास घातक घटक आढळत असून भविष्यात कॅन्सरसारख्या आजारांचा धोका वाढण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

विशेषम्हणजे, पिंपरी-चिंचवडमधील सुमारे ३५ लाख नागरिकांचे जीवन या नद्यांवर अवलंबून आहे. या पार्श्वभूमीवर आमदार महेश लांडगे यांनी विधानसभा अधिवेशनामध्ये लक्षवेधी मांडली होती. त्यावेळी रावेत आणि निघोजे या बंधाऱ्यांची पाहणी करुन ठोस उपाययोजना करण्याबाबत संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत प्रत्यक्ष पाहणी केली जाईल, असे आश्वासन पंकजा मुंडे यांनी दिले होते.

दरम्यान, पुणे जिल्ह्यातील नियोजित दौऱ्यानुसार, पंकजा मुंडे यांनी निघोजे येथील बंधाऱ्याला भेट दिली. यावेळी महापौर रवि लांडगे, आमदार महेश लांडगे, आमदार शंकर जगताप, आमदार उमा खापरे, आमदार अमित गोरखे, उपमहापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेता भाऊसाहेब भोईर, महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, पीएमआरडीएचे महानगर आयुक्त अभिजीत चौधरी, मुख्य अभियंता प्रमोद ओंबासे यांच्यासह महानगरपालिका, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, एमआयडीसी आणि पर्यावरण नियंत्रण महामंडळाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

**तात्काळ अपेक्षीत उपाययोजना**

महापालिकेत नव्याने समाविष्ट गावांमध्ये पवना नदीवर एसटीपी प्रकल्प तातडीने उभारणे. किवळे येथील २० एमएलडी एसटीपी प्रकल्पासाठी प्रलंबित जीआर त्वरित जारी करणे. रावेत व निघोजे बंधाऱ्यांवर अत्याधुनिक एरेटर बसवणे. प्रदूषण होणाऱ्या हॉटस्पॉट ठिकाणी वर्षभरात एसटीपी सुरू करणे आणि त्यासाठी पीएमआरडीए मार्फत जलपर्णी काढण्याची स्वतंत्र निविदा प्रसिद्ध करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

### मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत बैठक व्हावी...

पवना व इंद्रायणी नदीतून थेट पाणीपुरवठा बंद करून स्वतंत्र पाइपलाइन योजना राबवणे. निगडी व चिखली जलशुद्धीकरण केंद्रांवर टर्शरी ट्रीटमेंट व ओझोनेशन युनिट बसवणे. नदी सुधार प्रकल्पांत अधिक STP समाविष्ट करणे. जैवविविधता उद्याने, वृक्षारोपण आणि पर्यावरणपूरक विकासावर भर द्यावा. त्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती स्थापन करावी अशी मागणी यावेळी करण्यात आली. तसेच, एनआरसीडीकडून प्रकल्पांना तात्काळ मंजुरी मिळावी. या करिता केंद्र सरकारकडे पाठपुरावा वाढवणे. सर्व प्रलंबित प्रकल्पांना गती द्यावी, अशी मागणी आमदार लांडगे यांनी दिली.

> पिंपरी-चिंचवडमधील सुमारे ४० लाख नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने रावेत आणि निघोजे बंधाऱ्यातील पाण्याच्या प्रदूषणाचा प्रश्न गंभीर झाला आहे. याबाबत तात्काळ आणि दीर्घकालीन उपाययोजना कराव्यात. यासाठी महापालिका, पीएमआरडीए आणि राज्य शासनाकडे आम्ही सातत्याने पाठपुरावा करीत आहोत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली आगामी काळात दोन्ही नद्यांचा सुधार प्रकल्प आणि शुद्ध पाणी पुरवठा याबाबत कालबद्ध कार्यक्रम हाती घेणार आहोत. पुणे महानगर क्षेत्रातील सर्वच नद्यांच्या प्रदूषणमुक्तीसाठी राज्य सरकार निश्चितपणे सकारात्मक निर्णय घेत आहे.
> - **महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.



## सोरतापवाडीतील जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा; चार जणांवर गुन्हा

**उरुळी कांचन, ता. १० :** ओढ्यालगत छुप्या पद्धतीने सुरू असलेल्या तीन पत्ती जुगार अड्ड्याचा उरुळी कांचन पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. सोरतापवाडी (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील 'ए.के वाईन्स' समोरील ओढ्यालगत असलेल्या तीन खोल्यांच्या पाठीमागे बुधवारी (ता. ०८) सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली.


मेघराज उत्तम चौधरी (वय-३२, रा. चौधरीवस्ती, सोरतापवाडी), तात्यासो रामचंद्र चौधरी (वय-५४, रा. निसर्ग हॉटेल मागे, माळवाडी, सोरतापवाडी), नामदेव उर्फ राहुल ज्ञानदेव चोरघे (वय-४२, रा. चोरघेवस्ती, सोरतापवाडी), नवनाथ बाळासो आढाव (वय-५०, रा. आढाव वस्ती, सोरतापवाडी फाटा, सोरतापवाडी, ता. हवेली) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या चौघांची नावे आहेत. याप्रकरणी पोलीस शिपाई अश्वजित विनोद मोहोड यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, उरुळी कांचन पोलीस ठाण्याचे कर्मचारी सोरतापवाडी हद्दीत पेट्रोलिंग करत असताना, पोलीस हवालदार अजित काळे यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, 'ए. के. वाईन्स' समोरील ओढ्यालगत असलेल्या तीन खोल्यांच्या पाठीमागे काही लोक पैशावर जुगार खेळत आहेत. माहिती मिळताच पोलिसांनी दोन पंचांना पाचारण करून खासगी वाहनाने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी सदर ठिकाणी जाऊन खोल्यांच्या पाठीमागे छापा टाकला असता मेघराज चौधरी, तात्यासो चौधरी, नामदेव उर्फ राहुल चोरघे, नवनाथ आढाव हे चौघेजण गोलाकार बसून पैशावर तीन पत्ती नावाचा जुगार खेळताना रंगेहात मिळून आले. पोलिसांनी त्यांना जागीच ताब्यात घेतले. आरोपींची अंगझडती घेतली असता त्यांच्याकडे रोख रक्कम ८ हजार ८० रुपये, पत्त्यांचे कॅट आणि जुगाराची इतर साधने मिळून आली.

दरम्यान, ही कारवाई पोलीस हवालदार जगताप, अजित काळे, कम लेश होले, प्रविण चौधरी आणि अमोल खांडेकर यांच्या पथकाने केली आहे. पोलीस शिपाई अश्वजित मोहोड यांनी दिलेल्या तक्रारीनुसार आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## म्हसोबाचीवाडी आणि अकोल्यात घरफोडी; सव्वा तीन लाखांचा मुद्देमाल लंपास

**भिगवण, ता. १० :** भिगवण पोलीस ठाण्याच्या हद्दीत चोरट्यांनी आपला मोर्चा वळवला असून, एकाच रात्री दोन ठिकाणी घरफोडी करून लाखो रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला आहे. म्हसोबाची वाडी येथील कवडे वस्ती आणि अकोले येथील गायकवाड वस्ती येथे या चोरीच्या घटना घडल्या आहेत.

पहिल्या घटनेनुसार फिर्यादी नागेश बापूराव पवार (वय-३४) हे म्हसोबाची वाडी येथे राहतात. गुरुवारी (ता. ०९) मध्यरात्री साडेबारा ते पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास अज्ञात चोरट्याने त्यांच्या घराच्या दरवाजाची बाहेरून लावलेली कडी शिताफीने उघडली. घरात प्रवेश करून चोरट्याने लोखंडी कपाटातील ७४ हजार ४३९ रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेले.



दुसऱ्या घटनेत दुसरी मोठी चोरी अकोले येथील गायकवाड वस्ती येथे विशाल शिवाजी गायकवाड (वय-२८) यांच्या घरी घडली. गुरुवारी (ता. ०९) पहाटे एक वाजण्याच्या सुमारास चोरट्याने घराच्या टेरेसवरील उघड्या दरवाजावाटे आत प्रवेश केला. घरातील लोखंडी कपाट उघडून कपाटातील आणि बॅगेतील सोन्या-चांदीचे दागिने व रोकड असा एकूण २ लाख ५५ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. यामध्ये सोन्याचे नेकलेस, सोन्याचे झुबे फुले, सोन्याचे मंगलसूत्र, सोन्याची अंगठी, बदाम व चांदीच्या वस्तू असा मुद्देमाल अज्ञात चोरट्याने चोरून नेहला. या दोन वेगवेगळ्या घटनांत ३ लाख २९ हजारांचे दागिने अज्ञात चोरट्याने लंपास केले असून भिगवण पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

दरम्यान, परिसरातील वाढत्या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून, पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे. भिगवण पोलीस या दोन्ही प्रकरणांचा अधिक तपास करत आहेत.

## वरवंड येथील गोपीनाथ मंदिरातील पिंडीवर चढून अयोग्य कृत्य; एकावर गुन्हा दाखल

**दौंड, ता. १० :** वरवंड (ता. दौंड) येथील ग्रामदैवत श्री गोपीनाथ मंदिराच्या पवित्र गाभाऱ्यात एका भाविकाने देवाच्या पिंडीवर पाय ठेवून गळतीच्या साखळीला धरून उभे राहण्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज समोर आल्यानंतर ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली असून, धार्मिक भावना दुखावल्याप्रकरणी यवत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



सुग्रीव सर्जेराव पवार (रा. सोगाव, ता. करमाळा, जि. सोलापूर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या इसमाचे नाव आहे. याप्रकरणी मंदिराचे पुजारी रमेश प्रभाकर काकडे (वय-६५) यांनी यवत पोलीस ठाणे अंकित पाटस पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मंदिराचे पुजारी रमेश प्रभाकर काकडे गुरुवारी (ता. ०९) दुपारी चार वाजण्याच्या सुमारास ते मंदिराची साफसफाई आणि पूजेची तयारी करण्यासाठी गेले होते. त्यांनी गाभाऱ्याचे कुलूप उघडले असता, बाहेर नंदीजवळ बसलेला एक इसम त्यांच्या पाठोपाठ आत शिरला.

पुजारी काकडे सफाई करून बाहेर आले, तरीही तो इसम बाहेर आला नाही. त्यामुळे साडेचार वाजता काकडे यांनी पुन्हा गाभाऱ्यात जाऊन पाहिले असता, तो इसम चक्क महादेवाच्या पिंडीवर चढून गळतीच्या लोखंडी साखळीला धरून उभा असल्याचे दिसले. पुजाऱ्यांनी त्याला तत्काळ हाताला धरून गाभाऱ्यातून बाहेर काढले. या घटनेनंतर पुजारी काकडे यांनी गावचे तंटामुक्ती अध्यक्ष दशरथ दिवेकर यांना माहिती दिली. ग्रामस्थ मोठ्या संख्येने मंदिरात जमा झाले आणि त्यांनी सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यामध्ये या इसमाचे कृत्य स्पष्टपणे कैद झाले होते. ग्रामस्थांनी त्याला ओळखले असून, त्याचे नाव सुग्रीव सर्जेराव पवार (रा. सोगाव, ता. करमाळा, जि. सोलापूर) असल्याचे निष्पन्न झाले. हा इसम काही वर्षे वरवंडमध्ये राहिला असून तो अधूनमधून दर्शनासाठी येत असल्याचे समजले.

दरम्यान, गावातील सार्वजनिक शांतता अबाधित राखण्यासाठी आणि धार्मिक भावना दुखावल्याबद्दल कायदेशीर कारवाई व्हावी, यासाठी ग्रामस्थांनी पाटस पोलीस चौकी गाठली. पुजारी रमेश काकडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून यवत पोलिसांनी आरोपी सुग्रीव पवार याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम २९८ नुसार गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक कोल्हे करत आहेत. मंदिरासारख्या पवित्र ठिकाणी अशा प्रकारे अशोभनीय कृत्य केल्याने परिसरात चर्चा सुरू आहे.

## जय भवानी सहकारी सोसायटीच्या सचिवाला लाच स्वीकारताना पकडले

**आदित्य बोराटे**

इंदापूर, ता. १ : पीककर्ज मंजुरीसाठी शेतकऱ्याकडून लाचेची मागणी करणाऱ्या इंदापूर तालुक्यातील पंधरवाडी येथील जय भवानी विविध कार्यकारी सहकारी सोसायटीच्या सचिवाला ॲन्टी करप्शन ब्युरोच्या (CB) पथकाने रंगेहात पकडत मोठी कारवाई केली. याप्रकरणी नाना चंद्रकांत बोराटे (वय ४३) याच्याविरुद्ध इंदापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारदार (वय ३४) हे शेतकरी असून त्यांनी गट नं. १७३/२ वरील जुने पीक कर्ज फेडल्यानंतर नवीन कर्ज मिळविण्यासाठी जय भवानी सोसायटीमार्फत प्रस्ताव सादर केला होता.

या प्रस्तावावर कार्यवाही करण्यासाठी आरोपी सचिव नाना बोराटे यांनी सुरुवातीला २ हजार रुपयांची लाच मागितल्याची तक्रार ८ एप्रिल रोजी एसीबीकडे दाखल झाली.

तक्रारीनंतर एसीबीने तात्काळ पडताळणी कारवाई केली. ८ एप्रिल रोजी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या इंदापूर शाखेत झालेल्या पडताळणीत नाना बोराटे यांनी १ हजार रुपयांची लाच मागितल्याचे निष्पन्न झाले.

यानंतर ९ एप्रिल रोजी सापळा रचण्यात आला. पंधरवाडी येथील सोसायटीच्या आवारात आरोपीने तक्रारदाराकडून १ हजार रुपयांची लाच स्वीकारताच दुपारी १२:१९ वाजता एसीबीच्या पथकाने त्याला रंगेहात जेरबंद केले. ही कारवाई पोलीस निरीक्षक अविनाश धरबुडे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली असून तपास पोलीस निरीक्षक शैलजा शिंदे करीत आहेत.

## पाणी टंचाई दूर करण्यासाठी जलतारा प्रकल्प राबविणे काळाची गरज : सभापती युवराज काकडे

**लोणी काळभोर, ता. ९ :** हवेली तालुक्यातील तीव्र पाणीटंचाई लक्षात घेता गावागावात जलतारा प्रकल्प राबविण्याची गरज असल्याचे मत हवेली पंचायत समितीचे सभापती युवराज काकडे यांनी व्यक्त केले. हवेली पंचायत समितीत या अभियानाची विशेष आढावा बैठक जलतारा प्रकल्पाचे जनक जलतज्ञ डॉ. पुरुषोत्तम वायाळ यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

यावेळी जिल्हा परिषदेचे समाजकल्याण सभापती जितेंद्र बडेकर, सदस्या रुपाली कोंडे, कोमल आव्हाळे, शितल कांबळे, गटविकास अधिकारी शेखर शेलार, पंचायत समिती सदस्य युवराज वांजळे, सुदर्शन चौधरी, अमोल टेकाळे, सुषमा मुरकुटे, कोमलकांबळे, राणी वाळके यांच्यासह सर्व विभागांचे अधिकारी, सर्व ग्रामपंचायत अधिकारी व गावोगावचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सध्या उन्हाची तीव्रता वाढली असून गावागावातील विहिरींनी तळ गाठला आहे. तर बोअरवेल ही बंद होण्याच्या मार्गावर आले आहेत. त्यामुळे अनेक गावात दिवसाआड पाणी नागरिकांना मिळत आहे. त्यावर जलतारा प्रकल्प हा अत्यंत प्रभावी उपाय ठरू शकतो. या प्रकल्पावर महाराष्ट्र शासनाचे योजना तयार करण्याचे काम सुरू असून, येणाऱ्या काळात पाणी टंचाईवर मात करण्यासाठी, ही योजना अत्यंत प्रभावी योजना ठरणार आहे.



जलतारा प्रकल्पाचा मुख्य उद्देश जमिनीतील पाण्याची पातळी वाढविणे आणि भूजल पुनर्भरण करणे हा आहे. जलतारा प्रणालीमध्ये जमिनीच्या सर्वात उतार भागावर सुमारे ५ फुट लांब, ५ फुट रुंद व ६ फुट खोल आकाराचा खड्डा खोदला जातो. या खड्ड्यांमध्ये दगड, गोटे टाकून तो खड्डा बुजविला जातो. खड्डा बुजवताना साधारणपणे एक फुट वरची जागा रिकामी ठेवली जाते. त्यामुळे पावसाचे पाणी या खड्ड्यात सहजरीत्या जमा होते आणि झिरपून ते जमिनीत मुरते व जमिनीच्या पाणी पातळीत चांगली वाढ होते, असे जलतारा प्रकल्पाचे जनक जलतज्ञ डॉ. पुरुषोत्तम वायाळ यांनी सांगितले.

हवेली तालुका हा पुणे शहराच्या जवळ असुन सुद्धा अनेक गावागावात उन्हाळ्यात पाणी टंचाई आहे. त्यामुळे जलतारा योजना राबविली तर भूजल पुनर्भरण, सिंचन सुधारणा आणि शेती उत्पादन वाढते. भूजल पातळीतही १० ते १५ फुटांची वाढ होते. तसेच अतिवृष्टीतून पाणी साचणे टाळून, पिकांचे संरक्षण होते, वर्षभर सिंचन सुविधाही चांगल्या प्रकारे उपलब्ध होते. जलतारा ही योजना, महाराष्ट्र शासनाची एक महत्त्वाची जलसंधारण योजना म्हणून पुढील काळात समोर येणार असून, याचा मुख्य उद्देश पावसाचे पाणी साठवणे आणि भूजल पातळी वाढविणे हा असणार आहे. सध्या हा प्रकल्प शासन स्थरावर मान्यतेच्या प्रतिक्षेत असल्याने, हा प्रकल्प तूर्तास हवेली तालुक्यात राबविण्यासाठी, आमदार ज्ञानेश्वर कटके यांच्या मार्गदर्शनाखाली, हवेली तालुक्यातील सामाजिक संस्था, कंपन्यांच्या सीएसआर फंडातून व ग्रामपंचायतींच्या सहकार्याने हा प्रकल्प राबविण्याचा, हवेली पंचायत समितीचा विचार असुन, यासाठी गावागावातील होतकरू तरुण शेतकऱ्यांनी एकत्र येऊन, हवेली तालुक्याची पाणी टंचाई दुर करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन सभापती युवराज काकडे यांनी केले.

# माळशिरस येथील मराठा बटालियनच्या सैनिकाचा सेवापूर्ती निमित्त ग्रामस्थांकडून सत्कार सोहळा

सागर जगदाळे

भिगवण, ता. १० : भारतीय लष्करातील मराठा बटालियनमध्ये तब्बल वीस वर्षे उल्लेखनीय देशसेवा बजावून सेवानिवृत्त झालेल्या नवनाथ मारुती यादव यांचा सेवापूर्ती निमित्त ग्रामस्थांच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला. माळशिरस (ता. पुरंदर) येथील सूर्या लॉन्समध्ये आयोजित या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

कार्यक्रमात नवनाथ यादव यांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. त्यांच्या पत्नीचाही सन्मान करण्यात आला. विशेष म्हणजे, आपल्या एकुलत्या एक मुलाला देशसेवेसाठी लष्करात पाठवणाऱ्या त्यांच्या आई-वडिलांचा यावेळी विशेष गौरव करून उपस्थितांनी कृतज्ञता व्यक्त केली.



नवनाथ यादव यांनी २००६ साली यवत येथील विद्या विकास मंदिरमध्ये शिक्षण घेत असताना आपल्या मामांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय लष्करात प्रवेश केला. आपल्या सेवाकाळात त्यांनी कर्नाटक, गुजरातमधील जामनगर, उत्तर प्रदेशातील कानपूर, सियाचिन ग्लेशियर, जम्मू-काश्मीर, पंजाबमधील पठाणकोट, सिक्कीम, मध्य प्रदेश, कुपवाडा, बेळगाव अशा देशातील विविध संवेदनशील व दुर्गम भागांत कर्तव्य बजावले. त्यांच्या शौर्य, कर्तव्यनिष्ठा आणि समर्पणातून त्यांनी एक आदर्श निर्माण केला आहे.

या समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून उपशिक्षणाधिकारी मयूर यादव, जिल्हा परिषद सदस्या डॉ. प्राजक्ता दुर्गाडे, अजय इंगळे, अविनाश कुद्रळे माजी सदस्य गंगाराम जगदाळे, पंचायत समिती सदस्य माऊली यादव, मित्र परिवारातील संतोष राजगुरू, दीपक शेळके, बापू शेळके, अण्णा दोरगे, सचिन दोरगे, महेश पाटील, आशा बोरावके, संगीता दोरगे, वर्षा लकडे, मनीषा रायकर, माळशिरस ग्रामपंचायतीचे आजी-माजी सदस्य तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मयूर यादव यांनी केले, तर आभार प्रदर्शन महेश यादव यांनी केले. या सोहळ्यामुळे गावकऱ्यांमध्ये अभिमानाची भावना निर्माण झाली असून, सैनिकांच्या देशसेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा उपक्रम प्रेरणादायी ठरला.

## संक्षिप्त

### विद्यार्थ्याचे लैंगिक शोषण करणाऱ्या आरोपीला अटक

**पुणे, ता. १० :** मुलांचे भविष्य घडवण्यासाठी पालक मोठ्या आशेने त्यांना खासगी शिकवणी वर्गांत पाठवतात. मात्र, पुण्यात एका अल्पवयीन विद्यार्थ्यासोबत अत्यंत घृणास्पद प्रकार घडल्याने खळबळ उडाली आहे. मार्केट यार्ड भागातील एका प्रसिद्ध क्लासमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्याचे गेल्या तीन महिन्यांपासून लैंगिक शोषण केले जात होते. याप्रकरणी पोलिसांनी विकास दिलीप गायकवाड या कर्मचाऱ्याला बेड्या ठोकल्या आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी विकास गायकवाड हा संबंधित शिकवणी वर्गात कामाला होता. गेल्या तीन महिन्यांपासून त्याने या निष्पाप विद्यार्थ्याला आपल्या जाळ्यात ओढले होते. तो केवळ विद्यार्थ्यासोबत अश्लील कृत्य करून त्याचे मोबाईलमध्ये चित्रीकरण करून मुलांना ब्लॅकमेलही करत होता. गेल्या काही दिवसांपासून तो मुलगा क्लासला जायचे म्हंटल कि घाबरत होता. पालकांनी त्याला विश्वासात घेऊन विचारणा केली. तेव्हा त्याने सर्व काही सांगितले. पालकांनी वेळ न घालवता थेट पोलीस ठाणे गाठले. मार्केट यार्ड पोलिसांनी या प्रकरणी पोक्सो कायद्यांतर्गत कठोर गुन्हा दाखल करत आरोपीला अटक केली आहे.

### पत्नी घर सोडताच २८ वर्षीय तरुणाची आत्महत्या

**सोलापूर, ता. १० :** बार्शी तालुक्यातील पांगरी गावात घडलेल्या एका दुर्दैवी घटनेने व्यसनाच्या विळख्याचं भयावह वास्तव पुन्हा समोर आणलं आहे. २८ वर्षांचा प्रशांत रामा गायकवाड याने आयुष्याचा अंत केला, आणि त्यामागे कारण ठरलं ते दारूचं वाढत गेलेलं व्यसन आणि त्यातून कोलमडलेलं कौटुंबिक आयुष्य. प्रशांत गायकवाड हा पांगरी परिसरात वास्तव्यास होता. गेल्या काही काळापासून त्याला मद्यपानाचं व्यसन जडलेलं होतं. सुरुवातीला सवय म्हणून सुरू झालेलं हे व्यसन हळूहळू त्याच्या आयुष्यावरच हुकूमत गाजवू लागलं. घरातील वातावरण बिघडू लागलं, वाद वाढले आणि शेवटी परिस्थिती इतकी टोकाला गेली की, त्याची पत्नी आरती आणि मावशी रुक्मिणी यांनी सुमारे १५ दिवसांपूर्वी घर सोडलं.कुटुंबाची साथ सुटल्याने प्रशांत पूर्णपणे एकटा पडला. या एकटेपणासोबतच मानसिक ताणही वाढत गेला. ८ एप्रिलच्या रात्री त्याने आपल्या घरातच गळफास घेऊन आयुष्य संपवलं. शेजाऱ्यांना ही घटना लक्षात येताच नातेवाईकांना कळवण्यात आलं, मात्र तोपर्यंत खूप उशीर झाला होता.

# फुरसुंगी-उरुळी देवाची नगरपरिषदेच्या ओढ्यात टाकली एक्सपायर औषधे

**पुणे, ता. १० :** फुरसुंगी-उरुळी देवाची नगरपरिषदेच्या हद्दीत प्रशासनाच्या ढिसाळ कारभाराचा आणखी एक गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. गणेश नगर परिसरातील ओढ्यात मोठ्या प्रमाणावर एक्सपायर औषधे उघड्यावर फेकण्यात आली आहेत. त्यामुळे संपूर्ण परिसर दुर्गंधीने त्रस्त झाला असून नागरिकांच्या आरोग्यावर थेट धोका निर्माण झाला आहे.

औषधांचा कचरा हा अत्यंत धोकादायक आणि संवेदनशील मानला जातो. अशा कचऱ्याची विल्हेवाट शास्त्रशुद्ध पद्धतीने लावणे बंधनकारक असताना, संबंधित यंत्रणांनी डोळेझाक केल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. हा प्रकार केवळ



निष्काळजीपणा नसून नागरिकांच्या जीवाशी खेळ असल्याची संतप्त प्रतिक्रिया स्थानिकांकडून व्यक्त होत आहे.

दरम्यान, या दुर्गंधीमुळे शेजारील रहिवासी आणि रस्त्याने जाणारे नागरिक अक्षरशः हैराण झाले आहेत. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक यांना श्वसनाचे त्रास होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तरीही प्रशासन मात्र बघ्याची भूमिका घेत असल्याचा आरोप होत आहे. या प्रकरणी नगरपरिषदेच्या आरोग्य व स्वच्छता विभागाचे तुळसे यांच्याकडे भाजप नेते धनंजय आप्पा कामठे, विराज कड आणि श्याम जायभाई यांनी तातडीने कारवाईची मागणी केली आहे. दोषींवर कठोर कारवाई करून त्वरित परिसर स्वच्छ करावा, अन्यथा आंदोलनाचा इशारा देखील देण्यात आला आहे. आरोग्याशी खेळ करणाऱ्यांवर कारवाई कधी? आणि प्रशासन जागे होणार तरी कधी? असा नागरिकांनी एकच सवाल प्रशासनाला विचारला आहे.

# ऋतुजा वडघुले एमपीएससीत राज्यात प्रथम क्रमांकावर

**पुणे, ता. १० :** पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील टाकळी भिमा येथील शेतकरी कुटुंबातील ऋतुजा किसन वडघुले हिने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवले आहे. पहिल्याच प्रयत्नात तिने ओबीसी महिला प्रवर्गातून राज्यात १ क्रमांक मिळवला आहे.



या परीक्षेत तिची एकाच वेळी ३ पदांसाठी निवड झाली असून त्यामध्ये कर सहाय्यक, महसूल सहाय्यक आणि बेलीफ या पदांचा समावेश आहे. यापैकी तिने कर सहाय्यक पद स्वीकारण्याचा निर्णय घेतला आहे.

ऋतुजाचेशालेयशिक्षणटाकळी भिमा आणि निमगाव म्हाळुंगी येथील जिल्हा परिषद शाळांमध्ये झाले. त्यानंतर तिने तळेगाव ढमढेरे येथील महाविद्यालयातून इंग्रजी विषयात पदवी शिक्षण पूर्ण केले. पदवीचे शिक्षण घेत असतानाच तिने स्पर्धा परीक्षेची तयारी केली.विशेष म्हणजे, तिने कोणत्याही मार्गदर्शन वर्गाचा आधार न घेता स्वतःच्या अभ्यासाच्या जोरावर हे यश संपादन केले आहे.

तिच्या या यशाबद्दल गावात तिचा नागरी सत्कार करण्यात आला. या कामगिरीमुळे वडघुले कुटुंब आणि टाकळी भिमा गावाचे नाव राज्यभर चर्चेत आले आहे.



# अशोक खरात प्रकरणावरून विखे पाटलांचा निलेश लंकेवर हल्लाबोल

**पुणे, ता. १० :** भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर भाजपचे नेते सुजय विखे पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)चे खासदार निलेश लंके यांच्यावर नाव न घेता जोरदार टीका केली आहे. राहुरी पोटनिवडणुकीत सक्रिय झाल्यानंतर विखे पाटील यांनी हे वक्तव्य केले.

काही लोकप्रतिनिधी प्रत्येक ठिकाणी दिसतात. तुम्ही कुठलीही कॉन्ट्रोव्हर्सी काढा, तो व्यक्ती दिसणारच, असे म्हणत विखे पाटील यांनी सूचक टोला लगावला. खरात प्रकरण, घोटाळे, खंडणी किंवा इतर कोणतेही वाद असोत, त्यामध्ये एकाच व्यक्तीचे नाव वारंवार समोर येते, असे त्यांनी सांगितले.

विखे पाटील यांनी थेट नाव घेतले नसले तरी त्यांचा रोख खासदार नीलेश लंके यांच्याकडे असल्याची चर्चा सुरू झाली आहे. या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

तपासाबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, या प्रकरणात एसआयटीमार्फत चौकशी सुरू असून अनेक गोष्टी पुढे येत आहेत. बँक खात्यांचे तपशील समोर येऊ लागले असून या चौकशीत अनेक नवे धागेदोरे सापडतील, असे त्यांनी म्हटले.

कोणीही असो, कोणत्याही पक्षाशी संबंधित असो, पोलिस कारवाई करणारच, असे स्पष्ट करत त्यांनी कठोर कारवाईचा इशारा दिला. या वक्तव्यामुळे खरात प्रकरणात राजकीय आरोप-प्रत्यारोप अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# एकच कार्ड, संपूर्ण पुणे प्रवास! मेट्रो-३ आणि महामेट्रोसाठी कॉमन कार्डची तयारी अंतिम टप्प्यात

**पुणे, ता. १० :** पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या मेट्रो लाइन-३ चा पहिला टप्पा पुढील महिन्यात सुरू होण्याची शक्यता आहे. हिंजवडी ते शिवाजीनगर या मार्गावरील सुमारे १२ किलोमीटरचा टप्पा मे महिन्यात सुरू करण्याचे नियोजन आहे.

ही मेट्रो सेवा सुरू झाल्यानंतर प्रवाशांना मेट्रो-३ आणि महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनच्या मेट्रोमधून एकाच तिकीटावर प्रवास करता येणार आहे. त्यासाठी एकत्र तिकीट प्रणाली विकसित करण्यात येत असून हे काम अंतिम टप्प्यात आहे. हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो सुरू होईपर्यंत ही प्रणाली कार्यान्वित करण्याची तयारी सुरू आहे.

सध्या महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनकडून वनाझ ते रामवाडी आणि पिंपरी ते स्वारगेट या मार्गांवर मेट्रो



सेवा सुरू आहे. नव्या मेट्रो लाइन-३ ला जिल्हा न्यायालय मेट्रो स्थानकाशी जोडण्यात येणार असून यासाठी पादचारी पुलाचे काम सुरू आहे.


दोन्ही मेट्रो सेवांमध्ये प्रवास सुलभ करण्यासाठी एकच तिकीट प्रणाली लागू करण्यावर भर देण्यात आला आहे. यासाठी संबंधित अधिकाऱ्यांच्या ४ ते ५ बैठका झाल्या आहेत. मेट्रो कार्ड दोन्ही सेवांमध्ये वापरता येईल, यासाठी तांत्रिक समन्वयाचे काम सुरू आहे. वन पुणे कार्डच्या माध्यमातून ही सेवा उपलब्ध करून देण्याची तयारी करण्यात येत आहे.

याशिवाय पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पीएमआरडीए हद्दीत सार्वजनिक वाहतूक वापरणाऱ्या प्रवाशांसाठी मेट्रो आणि बस सेवांसाठी एकाच कार्डचा वापर करता यावा, यासाठीही प्रयत्न सुरू आहेत. यासंदर्भात महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनआणिपुणेमहानगरपरिवहन महामंडळाच्या अधिकाऱ्यांमध्ये बैठक झाली आहे.

# नातेपुते परिसरातील नीरा कालव्यात बुडून बहीण-भावाचा दुर्दैवी अंत

**पुणे, ता. १० :** शिक्षकांना भेटण्यासाठी घराबाहेर पडलेल्या सख्ख्या बहीण-भावाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे. मंगळवारी दुपारी किरण आणि काजल हे दोघे दुचाकीवरून फलटण येथील एका इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये गेले होते. तेथे आपले काम पूर्ण करून ते घरी निघाले, मात्र बराच वेळ झाला तरी ते परतले नाहीत. त्यामुळे चिंतेत पडलेल्या कुटुंबीयांनी फलटण शहर पोलीस ठाण्यात धाव घेत दोघे बेपत्ता असल्याची तक्रार नोंदवली.

दरम्यान, शोध सुरू असतानाच माळशिरस तालुक्यातील नातेपुते परिसरात नीरा उजवा कालव्यात दोन मृतदेह आढळल्याची माहिती समोर आली. धर्मपुरी ते गुरसाळे दरम्यान कालव्यात हे मृतदेह तरंगताना स्थानिकांना दिसले. माहिती मिळताच



नातेपुते पोलिसांनी ग्रामस्थांच्या मदतीने मृतदेह बाहेर काढले. त्यावेळी हे मृतदेह बेपत्ता असलेल्या किरण आणि काजल यांचेच असल्याचे स्पष्ट झाले.

किरण काकासाहेब चोपडे, वय २६, आणि काजल काकासाहेब चोपडे, वय २३, अशी मृतांची नावे असून ते बारामती तालुक्यातील मेखळी गावचे रहिवासी होते. प्राथमिक माहितीनुसार, दोघांचा मृत्यू कालव्यात बुडाल्याने झाला असावा, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. दोन्ही मृतदेहांचे नातेपुते ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले असून नंतर ते नातेवाइकांच्या ताब्यात देण्यात आले.

या घटनेमुळे चोपडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. एकाच वेळी घरातील दोन तरुण सदस्यांचा मृत्यू झाल्याने मेखळी गावातही शोककळा पसरली आहे. हा अपघात आहे की इतर काही कारण आहे, याचा तपास पोलीस करत आहेत. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# पुनावळ्यात विजेचा शॉक लागून १४ वर्षांचा मुलगा गंभीर जखमी

**पिंपरी चिंचवड, ता. १० :** शहरातील पुनावळे भागात मंगळवारी सकाळी घडलेल्या एका अपघातात १४ वर्षांचा मुलगा गंभीर जखमी झाला आहे. बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी उच्च दाबाच्या वीज तारांच्या जवळ गेल्याने त्याला जोरदार धक्का बसला आणि तो सुमारे ६५ टक्के भाजला. या घटनेमुळे परिसरातील बांधकाम स्थळांवरील सुरक्षेबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत.



समीर नझीर शेख असे जखमी मुलाचे नाव असून तो सध्या त्याच्यावर उपचार सुरु आहेत. हा प्रकार सकाळी सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास कैलास नगर येथील राहुल डाउनटाउन प्रकल्पाच्या ठिकाणी घडला. समीर इतर मुलांसोबत क्रिकेट खेळत असताना चेंडू बांधकामाच्या जागेवर पडला. तो चेंडू आणण्यासाठी मातीच्या ढिगावर चढला असता तो वीज तारांच्या जवळ गेला आणि त्याला धक्का बसला.

पोलिसांच्या माहितीनुसार, उत्खनननानंतर त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात माती साचली होती. ही माती थेट उच्च दाबाच्या तारांच्या खाली टाकण्यात आल्याने धोका निर्माण झाला होता. सुरक्षेचे नियम पाळले गेले नसल्याचे प्राथमिक तपासात दिसून आले आहे.

या प्रकरणी पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम १२५ अंतर्गत जागेचा मालक, कंत्राटदार आणि पर्यवेक्षक यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. रावेत पोलीस या घटनेचा अधिक तपास करत आहेत. समीरच्या काकांनी याबाबत तक्रार नोंदवली आहे. पुनावळे परिसरात जलद गतीने विकास होत असल्याने अनेक ठिकाणी बांधकाम सुरू आहे. मात्र, सुरक्षेचे नियम पाळले नाहीत तर अशा घटना पुन्हा घडू शकतात, अशी भीती स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे. प्रशासनाने याकडे गंभीरपणे लक्ष देण्याची गरज असल्याचेही सांगितले जात आहे.

# लोणी काळभोर येथे किशोरवयीन मुलींसाठी आरोग्य, सायबर सुरक्षा व जीवनशैलीवर मार्गदर्शन

**लोणी काळभोर, ता. १० :** सध्याच्या बदलत्या जीवनशैलीत किशोरवयीन मुलींना शारीरिक, मानसिक आणि सामाजिक स्तरावर अनेक आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर लोणी काळभोर (ता. हवेली) येथील कन्या शाळेत साधू वासवानी कॉलेज ऑफ नर्सिंगच्या पाचव्या सत्रातील विद्यार्थिनींनी एक अत्यंत उपयुक्त आणि स्तुत्य जनजागृती उपक्रम शुक्रवारी (ता.१०) राबवला.

या उपक्रमात विद्यार्थिनींनी शालेय मुलींशी थेट संवाद साधत किशोरवयीन शारीरिक बदल, त्या वयात उद्भवणाऱ्या समस्या आणि त्यावरील योग्य व्यवस्थापन याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.



अनेक वेळा या विषयांवर खुल्या पद्धतीने चर्चा होत नसल्याने मुलींमध्ये गैरसमज आणि भीती निर्माण होते. मात्र, नर्सिंग विद्यार्थिनींनी अत्यंत समजूतदारपणे आणि संवेदनशीलतेने संवाद साधत मुलींच्या शंकांचे निरसन केले.

यासोबतच सध्याच्या डिजिटल युगात वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर सायबर सुरक्षा हा विषयही विशेषत्वाने हाताळण्यात आला. सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, अनोळखी व्यक्तींशी संपर्क टाळणे, वैयक्तिक माहितीची गोपनीयता राखणे यांसारख्या महत्त्वाच्या बाबींबाबत विद्यार्थिनींना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच मोबाईलच्या अति वापरामुळे होणारे शारीरिक व मानसिक दुष्परिणाम याबाबतही जागरूकता निर्माण करण्यात आली.

या कार्यक्रमात प्राध्यापिका नमिता पाठक, शोभा पाटील, प्रियंका कदम आणि रुपाली शिंदे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थिनींनी हा उपक्रम अत्यंत प्रभावीपणे सादर केला. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थिनींमध्ये उत्स्फुर्त प्रतिसाद पाहायला मिळाला. अनेक मुलींनी आपल्या समस्या मोकळेपणाने मांडल्या व त्यावर मार्गदर्शन घेतले. त्यामुळे हा उपक्रम केवळ माहितीपुरता मर्यादित न राहता प्रत्यक्ष संवाद आणि समुपदेशनाचा प्रभावी मंच ठरला.

शाळेच्या मुख्याध्यापिका संजीवनी बोरकर यांनी या उपक्रमाचे मनापासून कौतुक करत, अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे विद्यार्थिनींना योग्य वयात योग्य दिशादर्शन मिळते. त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी हे अत्यंत आवश्यक आहे, असे सांगितले. तसेच त्यांनी सर्व विद्यार्थिनी व शिक्षकांचे आभार मानून भविष्यातही अशा उपक्रमांसाठी सहकार्य करण्याची ग्वाही दिली. एकंदरीत, या उपक्रमामुळे विद्यार्थिनींमध्ये आरोग्य, सुरक्षितता आणि जबाबदारीची जाणीव निर्माण झाली असून त्यांच्या आत्मविश्वासातही लक्षणीय वाढ झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. अशा उपक्रमांची गरज आजच्या काळात अधिक असून समाजाच्या आरोग्यदायी आणि सजग भविष्यासाठी ते अत्यंत महत्त्वाचे ठरत आहेत.

पुणे प्राईम न्यूज

http://www.puneprimenews.com

# हायड्रोपोनिक गांजाची तस्करी करणाऱ्या टोळीच्या मुख्य सूत्रधाराला अटक



**पुणे, ता. १० :** पुणे जिल्ह्यात अंमली पदार्थांच्या विरोधात पोलिसांनी सुरू केलेल्या कारवायांमध्ये आणखी एक मोठे यश मिळाले आहे. पिंपरी चिंचवड परिसरात महागड्या हायड्रोपोनिक गांजाची तस्करी करणाऱ्या टोळीच्या मुख्य सूत्रधाराला गुन्हे शाखेच्या युनिट २ ने अटक केली आहे. रोहित किशोर सुकेजा, वय ३४, राहणार पिंपरी कॅम्प असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. या कारवाईमुळे शहरातील ड्रग्ज नेटवर्कबाबत महत्त्वाची माहिती समोर येण्याची शक्यता आहे.

यापूर्वी २५ फेब्रुवारी रोजी काळेवाडी भागात पोलिसांनी कारवाई करून अक्षय मंथान, मयूर कपाटे आणि प्रतीक खैरनार या तिघांना ताब्यात घेतले होते. त्यांच्या जवळून हायड्रोपोनिक गांजा जप्त करण्यात आला होता. चौकशीत त्यांनी हा माल रोहित सुकेजा याच्याकडून मिळत असल्याचे सांगितले होते. त्यानंतर पोलिसांनी त्याचा शोध सुरू केला होता. सुमारे दीड महिन्यानंतर पोलिसांनी सापळा रचून त्याला अटक केली.

हायड्रोपोनिक गांजा हा मातीशिवाय पाण्याच्या मदतीने आणि नियंत्रित वातावरणात तयार केला जातो. हा प्रकार साध्या गांजापेक्षा जास्त महाग आणि अधिक नशा देणारा असतो. तपासात असेही समोर आले आहे की, हा गांजा परदेशातून पाठवला जात होता. कुरिअर किंवा इतर गुप्त मार्गांनी तो भारतात आणला जात असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. यापूर्वीच पोलिसांनी ३ लाख ५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. आता रोहितच्या अटकेनंतर या प्रकरणातील आंतरराष्ट्रीय संबंध आणि शहरातील ग्राहकांबाबत अधिक तपास सुरू आहे.

# सिंहगड रोड पोलिसांनी सापळा रचला अन् आरोपी गजाआड



**पुणे, ता. १० :** पुण्यातील सिंहगड रोड परिसरात गोळीबार करून दहशत निर्माण करणाऱ्या ५ अल्पवयीन मुलांना पोलिसांनी अवघ्या २४ तासांत ताब्यात घेतले आहे. त्यांच्या ताब्यातून एक पिस्तुल आणि दोन लोखंडी कोयते जप्त करण्यात आले असून या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

ही घटना ७ एप्रिल २०२६ रोजी रात्री सुमारे ११:४५ वाजता वडगाव बुद्रुक येथील चरवडवस्ती भागात घडली. जुन्या वादातून ५ ते ६ जणांनी एका व्यक्तीवर लोखंडी हत्याराने हल्ला करत पिस्तुलातून गोळीबार केला. या घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. याप्रकरणी सिंहगड रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन परिमंडळ ३ चे पोलीस उपायुक्त संभाजी कदम आणि सहाय्यक पोलीस आयुक्त अजय परमार यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू करण्यात आला. तपासादरम्यान पोलीस अंमलदार विनायक मोहिते आणि तानाजी सागर यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार आरोपी शरद हॉस्पिटल परिसरातून प्रयोग सिटीच्या दिशेने थांबले असल्याचे समोर आले.

यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षकांच्या आदेशाने सहाय्यक पोलीस निरीक्षक समीर करपे, उपनिरीक्षक संतोष भांडवलकर आणि त्यांच्या पथकाने सापळा रचला. पोलिसांना पाहताच आरोपींनी पळण्याचा प्रयत्न केला, मात्र पोलिसांनी पाठलाग करून त्यांना ताब्यात घेतले. झडतीदरम्यान त्यांच्याकडून एक पिस्तुल आणि दोन कोयते जप्त करण्यात आले.

तपासात हे सर्व आरोपी अल्पवयीन असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून त्यांना येरवडा येथील पंडित जवाहरलाल नेहरू बालसुधारगृहात पाठवण्यात आले आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सह पोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा, अपर पोलीस आयुक्त राजेश बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनय पाटणकर, समीर गायकवाड, समीर करपे, संतोष भांडवलकर तसेच त्यांच्या पथकाने केली आहे. या कारवाईमुळे सिंहगड रोड परिसरातील नागरिकांनी सुटकेचा निश्वास टाकला आहे.

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा वहिनींच्या प्रचारासाठी खासदार सुप्रिया सुळे बारामतीत उतरणार?



**पुणे, ता. १० :** बारामती पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या सुप्रिया सुळे यांनी महत्त्वाचे वक्तव्य केले आहे. अजित पवार गटाकडून बोलावणे आल्यास आपण सुनेत्रा पवारांच्या प्रचाराला जाण्याचे संकेत त्यांनी दिले आहेत.

माझा रोल मतदानाला जाण्याचा आहे. शेवटी रिश्तेही मायने रखते है, असे म्हणत त्यांनी कुटुंबीय नात्यांना प्राधान्य असल्याचे स्पष्ट केले. सुनेत्रा पवारांच्या प्रचाराबाबत विचारले असता, हा प्रश्न अजित पवार गटाने विचारायला हवा, असे सांगत त्यांनी थेट उत्तर देणे टाळले, पण बोलावले तर प्रचाराला जाण्याची तयारी दर्शवली. बारामती पोटनिवडणूक बिनविरोध का झाली नाही, याबाबतही त्यांनी सूचक टिप्पणी केली. याचे उत्तर अजित पवार गटालाच विचारा, कारण सगळी मॅनेजमेंट त्यांच्याकडे होती, असे म्हणत त्यांनी अप्रत्यक्षपणे अजित पवार गटावर टीका केली.

त्या पुढे म्हणाल्या की, निवडणुकीच्या काळात कार्यकर्ते लढण्यास उत्सुक असतात, त्यामुळे अनेक गोष्टी घडत असतात. काल दिवसभर त्या बारामतीत नव्हत्या, त्यामुळे नेमक्या घडामोडींची माहिती नसल्याचेही त्यांनी सांगितले.

पैसा आणि सत्ता यापेक्षा कुटुंब महत्त्वाचे आहे. त्यामुळेच मी नेहमी म्हणते, रिश्ते मायने रखते है, असे सांगत त्यांनी संपूर्ण कुटुंब सुनेत्रा पवार यांच्या पाठीशी असल्याचेही स्पष्ट केले. सुप्रिया सुळे या विठ्ठल दर्शनासाठी आल्या असताना त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. त्यांच्या या वक्तव्यामुळे बारामती पोटनिवडणुकीत राजकीय चर्चांना आणखी वेग आला आहे.

# डिजिटल अरेस्टच्या नावाखाली वृद्ध महिलेची ९७ लाखांची फसवणूक




**पुणे, ता. १० :** शहरात सायबर फसवणुकीच्या घटना पुन्हा वाढताना दिसत आहेत. कॅम्प परिसरातील ८४ वर्षांच्या एका वृद्ध महिलेला अज्ञात फोन करून स्वतःला पोलीस अधिकारी सांगत चोरट्यांनी तब्बल ९७ लाख ४७ हजार रुपयांची फसवणूक केली आहे. या प्रकरणी शिवाजीनगर सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, २७ मार्च ते ७ एप्रिल २०२६ या कालावधीत हा प्रकार घडला. महिलेच्या फोनवर आलेल्या कॉलमध्ये आरोपीने तिच्या नावावर असलेला मोबाईल क्रमांक जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात वापरला गेला असल्याचे सांगितले. ही माहिती ऐकून महिला घाबरली. त्यानंतर आरोपींनी या प्रकरणाचा तपास आरबीआयकडून सुरू असल्याचे सांगून तिला अटक होऊ शकते, अशी भीती दाखवली.

भीतीच्या वातावरणात आरोपींनी महिलेला दोन वेगवेगळ्या बँक खात्यांमधून पैसे ट्रान्सफर करण्यास भाग पाडले. अशा प्रकारे तिच्याकडून एकूण ९७ लाख ४७ हजार रुपये उकळण्यात आले. काही दिवसांनी आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर महिलेने पोलिसांकडे तक्रार केली. या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक संगीता देवकाते करत आहेत.

दरम्यान, अशाच प्रकारच्या दुसऱ्या घटनेत वानवडी येथील ६३ वर्षांच्या व्यक्तीला पार्सलमध्ये ड्रग्ज आढळल्याचे सांगून २९ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली. आरोपींनी स्वतःला सायबर अधिकारी सांगत बनावट कागदपत्रांच्या आधारे ही रक्कम उकळली. या वाढत्या घटनांमुळे नागरिकांनी अनोळखी कॉल आणि मेसेजपासून सावध राहण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे. कोणतीही वैयक्तिक किंवा आर्थिक माहिती देताना काळजी घेणे गरजेचे असल्याचेही सांगितले आहे.






Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



# घरच्या घरी बिर्याणी मसाला बनवा आणि जेवणाची लज्जत वाढवा

भाज्या असो, डाळी असो किंवा बिर्याणीसारखे खास पदार्थ असो यांमध्ये योग्य मसाल्यांचा वापर जेवणाला चवदार बनवतो. म्हणूनच हिंदुस्थानी स्वयंपाकघरांमध्ये विविध प्रकारचे मसाले नेहमीच साठवेले असतात. किचन किंग मसाला, बिर्याणी मसाला आणि गरम मसाला सारखे मसाले जवळजवळ प्रत्येक घरात सामान्य आहेत.

आजकाल बाजारात अनेक तयार मसाले सहज उपलब्ध असले तरी, घरगुती मसाले हा एक अनोखा अनुभव असतो. घरगुती मसाले केवळ ताजे आणि अधिक सुगंधित नसतात, तर त्यात कोणतेही संरक्षक किंवा भेसळ केलेली नसते. असेच काही मसाले घरी बनवण्याची पद्धत आपण या लेखात जाणुन घेउया.

किचन किंग मसाला : किचन किंग मसाला बनवण्यासाठी, प्रथम धणे, जिरे, काळी मिरी, लवंग, दालचिनी, वेलची, सुक्या लाल मिरच्या आणि थोडी हळद घ्या. हे सर्व मसाले मंद आचेवर सुगंध येईपर्यंत भाजून घ्या. थंड झाल्यावर, त्यांना मिक्सरमध्ये बारीक वाटून बारीक पावडर बनवा. तयार केलेला मसाला हवाबंद डब्यात ठेवा तायार आहे किचन किंग मसाला.

बिर्याणी मसाला : बिर्याणी मसाला बनवण्यासाठी, तमालपत्र, दालचिनी, लवंग, काळी मिरी, मोठी वेलची, लहान वेलची, एका जातीची बडीशेप आणि जावित्री घ्या. हे मसाले हलकेभाजून घ्या आणि थंड झाल्यावर, त्यांना बारीक पावडर करुन घ्या . हा मसाला बिर्याणी, पुलाव आणि विशेष भाताच्या पदार्थांमध्ये वापरता येतो.

पावभाजी मसाला : पावभाजी मसाला बनवायला अगदी सोपा आहे. तुम्हाला फक्त धणे, जिरे, एका जातीची बडीशेप, काळी मिरी, सुक्या लाल मिरच्या, दालचिनी, लवंगा आणि आंब्याची पावडर लागेल. हे मसाले एका तव्यावर हलकेभाजून घ्या. थंड झाल्यावर त्यांची पावडर बनवा. तयार आहे तुमचा पावभाजी मसाला.

छोले मसाला : छोले मसाला बनवण्यासाठी धणे, जिरे, काळी मिरी, दालचिनी, लवंगा, डाळिंबाचे दाणे, सुक्या लाल मिरच्या आणि थोडी कसुरी मेथीची गरज आहे. हे मसाले हलकेभाजून घ्या, थंड होऊ द्या आणि नंतर मिक्सरमध्ये बारीक करा. हा मसाला विशेषतः हरभरा करीमध्ये वापरला जातो, ज्यामुळे त्याची चव वाढते.

गरम मसाला : गरम मसाला बनवण्यासाठी दालचिनी, लवंगा, काळी मिरी, लहान वेलची, मोठी वेलची आणि तमालपत्र घ्या. हे मसाले मंद आचेवर भाजून घ्या जेणेकरून त्यांचा सुगंध सुटेल. नंतर, त्यांना पूर्णपणे थंड होऊ द्या आणि मिक्सरमध्ये पावडरमध्ये बारीक करा. तुमचा गरम मसाला हा प्रत्येक जेवणाचा प्राण असतो यामुळे पदार्थाची अप्रतिम चव आणि सुगंध वाढवतो .

# शिंदवणे येथील हातभट्टीच्या अड्ड्यावर पोलिसांचा छापा; महिलेवर गुन्हा दाखल

**उरुळी कांचन, ता. १०** : शिंदवणे (ता. हवेली) हद्दीत बेकायदेशीरपणे सुरू असलेल्या गावठी दारूच्या हातभट्टीवर उरुळी कांचन पोलिसांनी छापा टाकला. याप्रकरणी एका महिलेला ताब्यात घेण्यात आले असून तिच्याकडून पोलिसांनी १४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. हि कारवाई शिंदवणे गावच्या हद्दीतील काळेशिवार परिसरातील राठोड वस्ती परिसरात गुरुवारी (ता. ०९) सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास करण्यात आली.



रजनी संजय राठोड (वय-४३, रा. काळेशिवार, राठोड वस्ती, शिंदवणे) असे ताब्यात घेण्यात आलेल्या महिलेचे नाव आहे. याप्रकरणी महिला पोलीस शिपाई संध्या दादासो शिंदे यांनी याप्रकरणी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलीस उपनिरीक्षक मत्रे आणि त्यांचे पथक अवैध दारूचा शोध घेत असताना, गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, एक महिला शिंदवणे परिसरात हातभट्टी चालवत आहे. अशी माहिती मिळाली होती. मिळलेल्या माहितीनुसार पोलिसांनी दोन पंचांना सोबत घेऊन सरकारी वाहनाने काळेशिवार परिसरातील राठोड वस्ती येथे छापा टाकला.

यावेळी एक महिला गावठी दारू तयार करण्याचे साहित्य आणि रसायनासह प्रत्यक्ष दारू गाळण्याचे काम करताना आढळली. पोलिसांनी तिला जागीच ताब्यात घेतले. तिच्याकडे चौकशी केली असता तिने आपले नाव रजनी संजय राठोड असल्याचे सांगितले.पंचांसमक्ष केलेल्या पाहणीत ३० लिटर तयार गावठी दारू, कच्चे रसायन, जळके रसायन व इतर साहित्य असा १४ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

दरम्यान, याप्रकरणी आरोपी रजनी राठोड हिच्यावर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४३ चे कलम ६५ (क) (फ) (ई) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी महिला असल्याने तिला तपासासाठी हजर राहण्याबाबत नोटीस देण्यात आली आहे. तपास पोलीस हवालदार लोखंडे करीत आहेत.

## चिखली येथे काळ्या म्हटल्याने तरुणावर कोयत्याने हल्ला

**पिंपरी, ता. १०** : नगरसेवकाच्या कार्यालयासमोर उभा असताना थट्टा-मस्करीमध्ये काळ्या असे संबोधल्याचा राग मनात धरून एका तरुणाने हातगाडी चालकाच्या डोक्यात कोयत्याने वार केले. ही घटना चिखली येथील जाधववाडी परिसरात बुधवारी (ता. ०८ एप्रिल) रोजी रात्री साडेनऊ वाजताच्या सुमारास घडली. तळेगाव दाभाडे परिसरात जमिनीच्या वादातून कुटुंबाचे अपहरण करुन तुम चा मुळशी पॅटर्न करतो अशी धमकी दिली. चिखलीतील घटनेप्रकरणी बब्रुवान सुभाष सुर्यवंशी (वय-३८, रा. जाधववाडी, चिखली) यांनी चिखली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार मंगेश ज्ञानेश्वर मांडगे (वय-२२, रा. जाधववाडी) याला अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी हे दालचा राईसची हातगाडी चालवतात. आरोपी हा त्यांचा नियमित ग्राहक आहे.

# बारामतीत अभिजित बिचुकले अन् करुणा मुंडे पोटनिवडणुक लढविणार

**बारामती, ता. १०** : बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत मोठ्या घडामोडी घडल्या असून तब्बल ३० उमेदवारांनी आपले अर्ज माघारी घेतले आहेत. मात्र, एवढ्या मोठ्या प्रमाणात माघार घेऊनही निवडणूक होणार हे निश्चित झाले आहे. अभिजित बिचुकले आणि करुणा मुंडे-शर्मा यांनी आपले अर्ज कायम ठेवल्यामुळे ही लढत कायम राहणार आहे.



उमेदवारी अर्ज माघारी घेण्याच्या शेवटच्या दिवशी काँग्रेसनेही माघार घेतली. काँग्रेसचे उमेदवार आकाश मोरे यांनी अर्ज मागे घेतला. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी ही घोषणा करताना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी फोन करून विनंती केल्याचे सांगितले. तसेच आमदार रोहित पवार यांनीही सकाळी भेट घेतल्याची माहिती त्यांनी दिली. राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनीही माघारीबाबत सूचना केल्याचा उल्लेख त्यांनी केला.

बारामतीत एकूण ५३ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले होते. त्यापैकी ३० जणांनी अर्ज माघारी घेतल्याने आता २३ उमेदवार रिंगणात उरले आहेत. गुरुवारी ६ जणांनी अर्ज मागे घेतले होते, तर शेवटच्या दिवशी २४ उमेदवारांनी माघार घेतली.

दरम्यान, बिग बॉस फेम अभिजित बिचुकले आणि करुणा मुंडे-शर्मा यांनी आपले अर्ज कायम ठेवले आहेत. अर्ज माघारी घेण्याच्या दिवशी हे दोघेही बारामतीत उपस्थित नसल्यामुळे त्यांनी माघार घेतली नाही. त्यामुळे आता या दोघांच्या उपस्थितीत निवडणुकीची लढत अधिक रंगतदार होणार आहे. बाराम ती पोटनिवडणुकीसाठी २३ एप्रिल रोजी मतदान होणार असून ४ मे रोजी मतमोजणी होईल.

या निवडणुकीसाठी भाजपने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह ४० स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली आहे. यात रविंद्र चव्हाण, नितीन गडकरी, शिव प्रकाश, चंद्रशेखर बावनकुळे, विनोद तावडे, अशोक चव्हाण, सुधीर मुनगंटीवार आणि चंद्रकांत पाटील यांसारख्या नेत्यांचा समावेश आहे. त्यामुळे बारामतीतील ही निवडणूक आता अधिकच लक्षवेधी ठरणार आहे.

## व्हायरल गर्लमोनालिसाचे लग्नासाठी बनावट बर्थ सर्टिफिकेट; पतीवर गुन्हा

**महेश्वर, ता. १०** : कुंभमेळ्यातील फोटोंमुळे रातोरात प्रसिद्धीच्या झोतात आलेली 'व्हायरल गर्ल' मोनालिसा आणि फरमान खान यांचा विवाह सध्या देशभर चर्चेचा आणि वादाचा विषय ठरला आहे. या प्रकरणाला सुरुवातीला 'लव्ह जिहाद'चा रंग देण्यात आला होता, मात्र आता राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाच्या तपासात एक धक्कादायक वास्तव समोर आले आहे. मोनालिसा लग्नाच्या वेळी अल्पवयीन होती आणि तिची कागदपत्रे बनावट असल्याचे सिद्ध झाल्याने तिचा पती फरमान खानच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे.

मोनालिसा आणि फरमान खान यांचा विवाह पार पडला. या विवाहासाठी केरळमध्ये नोंदणी करताना मोनालिसाचे वय १८ वर्षे असल्याचे जन्म प्रमाणपत्र सादर करण्यात आले होते. मात्र, ती अल्पवयीन असल्याचा दावा करत चौकशीची मागणी कुटुंबीयांनी केली



होती. एनसीएसटीचे अध्यक्ष अंतरसिंग आर्य यांनी स्थापन केलेल्या तपास पथकाने तीन दिवसांत अहवाल सादर केला. या तपासात सरकारी रुग्णालयातील नोंदीनुसार, मोनालिसाचा जन्म ३० डिसेंबर २००९ चा आहे. याचा अर्थ लग्नाच्या दिवशी तिचे वय अवघे १६ वर्षे आणि २ महिने होते. कायद्यानुसार ती अल्पवयीन असल्याचे स्पष्ट झाले आहे. दरम्यान, आता या प्रकरणी खरगोनच्या महेश्वर पोलीस ठाण्यात फरमान खानविरुद्ध 'पोक्सो' आणि अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## 'धुरंधर २' चित्रपट आता ओटीटीवर होणार रिलीज

**मुंबई, ता. १०** : भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासात कमाईचे नवे विक्रम प्रस्थापित करणारा रणवीर सिंहचा स्पाय-थ्रिलर 'धुरंधर २' आता डिजिटल पडद्यावर धडकण्यासाठी सज्ज झाला आहे. चित्रपटगृहात १६६० कोटींहून अधिक गल्ला जमवल्यानंतर, हा सिनेमा ओटीटीवर कधी येणार, याची प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता आहे.

आदित्य धर यांच्या दिग्दर्शनाखाली बनलेल्या या सिनेम ने भारतीय बॉक्स ऑफिसवर १२०० कोटींचा टप्पा पार केला, तर अवघ्या काही दिवसांत १००० कोटींच्या क्लबमध्ये सामील होणारा हा पहिला भारतीय चित्रपट ठरला. १९ मार्च रोजी प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाने पहिल्या दिवसापासूनच प्रेक्षकांना वेड लावले. रणवीर सिंहच्या कारकिर्दीतील हा आतापर्यंतचा सर्वात मोठा हिट ठरला आहे. 'धुरंधर'चा




पहिला भाग नेटफ्लिक्सवर सुपरहिट ठरला होता, पण दुसऱ्या भागासाठी दिग्दर्शक आदित्य धर यांनी या चित्रपटाचे डिजिटल हक्क जिओ होट स्टार ला विकले आहेत. याचाच अर्थ, हा हाय-व्होल्टेज क्शन ड्रामा पाहण्यासाठी चाहत्यांना जिओ हॉटस्टारचे सबस्क्रिप्शन घ्यावे लागणार आहे.

आयपीएल २०२६ च्या धाम धुमीमुळे मेकर्सनी ओटीटी रिलीज थोडा लांबणीवर टाकला आहे. क्रिकेटचा फिव्हर कमी झाल्यानंतर, म्हणजे मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात किंवा जूनच्या पहिल्या आठवड्यात हा चित्रपट स्ट्रीम होण्याची दाट शक्यता आहे.

# गाडीला एचएसआरपी प्लेट न लावल्यास आता बसणार १० हजारांचा दंड

**पुणे, ता. १०** : जर तुमच्या वाहनाला अजूनही हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसवलेली नसेल, तर आता तात्काळ लक्ष देण्याची गरज आहे. सरकारने या नियमाची कडक अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला असून १७ एप्रिल ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली आहे. या तारखेनंतर नियम तोडणाऱ्यांवर मोठा दंड आकारला जाणार आहे.



१७ एप्रिलनंतर एचएसआरपी नसलेल्या वाहनांवर १० हजार रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो. तसेच, नंबर प्लेट नसल्यास आरटीओशी संबंधित कामे, विमा नूतनीकरण आणि कागदपत्रांची पडताळणी यामध्ये अडथळे येऊ शकतात. त्यामुळे शेवटच्या क्षणाची धावपळ टाळण्यासाठी लवकरात लवकर नंबर प्लेट बसवणे आवश्यक आहे.


याशिवाय, एचएसआरपी नसलेल्या वाहनांना प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र पीयुसीसी देखील मिळणार नाही. त्यामुळे वाहनाशी संबंधित अनेक कामे अडकूश कतात.

एचएसआरपी नंबर प्लेटसाठी अर्ज करणे सोपे आहे. महाराष्ट्र परिवहन विभागाच्या अधिकृत वेबसाइटवर जाऊन ऑनलाइन अर्ज करता येतो. त्यासाठी वाहनाची माहिती भरावी लागते. त्यानंतर नंबर प्लेट बसवण्यासाठी तारीख आणि वेळ दिली जाते. एचएसआरपी ही एक सुरक्षित नंबर प्लेट असून त्यामध्ये विशेष कोड आणि होलोग्राम असतो. त्यामुळे वाहनाची ओळख पटवणे सोपे होते आणि बनावट नंबर प्लेट किंवा चोरीच्या घटना कमी होण्यास मदत होते. तसेच, पीयुसीसी प्रमाणपत्रनसल्यासही दंड आकारला जातो. पहिल्या वेळी १,००० रुपये, दुसऱ्यांदा २,००० रुपये आणि वारंवार नियम तोडल्यास १०,००० रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो. जर वाहनावर एचएसआरपी आणि पीयुसीसी दोन्ही नसतील, तर स्वतंत्रपणे दंड आकारला जाऊ शकतो.

त्यामुळे मोठा दंड टाळण्यासाठी आणि अडचणी टाळण्यासाठी तातडीने एचएसआरपी नंबर प्लेट बसवणे गरजेचे आहे.

# अहिल्यानगरमध्ये ४० वर्षांपासून अशोक खरातची भोंदूगिरी

**नाशिक, ता. १०** : लैंगिक अत्याचार प्रकरणात अटकेत असलेल्या भोंदूबाबा अशोक खरातबाबत रोज नवे खुलासे होत आहेत. आता त्याच्या भोंदूगिरीची सुरुवात तब्बल ४० वर्षांपूर्वी अहिल्यानगरमध्येच झाल्याची माहिती समोर आली आहे. त्या काळात त्याने लक्ष्मण या नावाने गावात भोंदूगिरी सुरू केली होती.



मिळालेल्या माहितीनुसार, खरातने गावातील एका महिलेला आपल्या जाळ्यात ओढून तिच्यावर लैंगिक अत्याचार केले होते. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर गावकऱ्यांनी त्याला बेदम मारहाण केली होती. त्यानंतर तो तिथून पळून गेला होता.

अशोक खरात हा सिन्नर तालुक्यातील तांदळवाडी येथे जन्मला. तो दहावीपर्यंत शिकला, मात्र परीक्षेत नापास झाला. त्यानंतर तो अहिल्यानगरमध्ये नातेवाईकांकडे आला आणि तिथेच भोंदूगिरी सुरू केली. हा त्याचा पहिला प्रकार असल्याचे सांगितले जात आहे.


या घटनेनंतर तो काही वर्ष गायब होता. साधारण १० ते १५ वर्ष तो कुठे होता याची माहिती उपलब्ध नाही. नंतर परत आल्यावर त्याने स्वतःला ब्रम्हांडशास्त्र आणि कॅप्टन अशी ओळख देण्यास सुरुवात केली. काही काळ तो बंगालमध्ये राहिला होता, तिथे काळी जादू शिकल्याचा दावा केला जातो. त्यानंतर परदेशातही गेल्याची माहिती आहे. १९९५ मध्ये त्याने सिन्नरमधील मिरगाव येथे आपले ठाण मांडले. तिथे शेतकऱ्यांकडून जागा घेऊन मंदिर उभारले. हळूहळू त्याच्याकडे भक्तांची गर्दी वाढली. काही अधिकारी आणि राजकीय व्यक्तीही त्याच्याकडे येऊ लागले. याच काळात त्याने महिलांचे शोषण केल्याचे आणि काहींच्या जमिनी बळकावल्याचे आरोप आहेत.

अहिल्यानगरमध्ये सुरू झालेली ही भोंदूगिरी पुढे मोठ्या प्रमाणात वाढत गेली. सुरुवातीलाच कारवाई झाली असती तर पुढील अनेक प्रकार टळले असते, अशी चर्चा आता होत आहे.

# शक्तिपीठ महामार्गाला हिरवा कंदील! ८५६ किमीचा गेमचेंजर प्रकल्प

## १३ जिल्ह्यांचा विकास वेगाने धावणार

**मुंबई, ता. १०** : राज्य सरकारने बहुप्रतिक्षित शक्तिपीठ महामार्गाच्या सुधारित आराखड्याला अखेर मंजुरी दिली आहे. या प्रकल्पामुळे राज्यातील विविध भागांमधील संपर्क अधिक सोपा होणार असून ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये विकासाला चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. हा महामार्ग सुमारे ८५६.७६ किलोम ीटर लांबीचा असून वर्धा जिल्ह्यातील दिग्रज ते सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बांदा (सावंतवाडी) असा मार्ग असणार आहे. या प्रकल्पात एकूण १३ जिल्हे आणि ४० तालुके समाविष्ट आहेत. कोल्हापूर, सांगली, सातारा आणि सोलापूर जिल्ह्यांतील अनेक गावे या मार्गाशी जोडली जाणार आहेत. प्रकल्पामध्ये नद्यांवर पूल बांधणे तसेच डोंगराळ भागात घाटमार्ग तयार करण्याचे नियोजन आहे.




सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यांतील बागायती शेतीवर परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेऊन स्थानिक शेतकरी आणि लोकप्रतिनिधींनी यापूर्वी आंदोलन केले होते. या पार्श्वभूमीवर सरकारने मूळ आराखड्यात बदल करून सुधारित योजना तयार केली आहे. त्यामुळे आता सातारा जिल्ह्यालाही या महामार्गाचा थेट फायदा मिळणार आहे.

सुधारित आराखड्यामुळे महामार्गापासून दूर राहिलेली अनेक गावे विकासाच्या मुख्य प्रवाहात येतील. त्यामुळे ग्रामीण भागातील रस्ते, बाजारपेठा आणि इतर सुविधा सुधारण्यास मदत होईल. सांगली जिल्ह्यातील एतवडे खुर्द, कुसळ, कुंडलवाडी, वेटर-इटके, तुजारपूर, नवे खंड, ममूचीवाडी, दुधडी, बोगाव, कुंडल, कुंभारगाव, देवराष्ट्र, शिरगाव, भालवणी, शेलकवठ, आटपाडी, नेवरी, ढिंगणगे, नागठाणे, भांगर, वाळवड, भिकवडी बु., माळणी आणि पेंडवडे या गावांचा समावेश करण्यात आला आहे. या महामार्गामुळे शेतीमालाची वाहतूक सुलभ होईल आणि ग्रामीण बाजारपेठांना नवी संधी मिळेल. तसेच उद्योग क्षेत्रात गुंतवणूक वाढण्याची शक्यता असून राज्याच्या आर्थिक विकासाला गती मिळेल, असा विश्वास सरकारने व्यक्त केला आहे.

# बारामतीत तांब्याच्या तारा चोरणाऱ्या चोरट्यांना पोलिसांनी केली अटक

**बारामती, ता. १०** : बारामती एमआयडीसी परिसरात घडलेल्या दोन वेगवेगळ्या चोरीच्या घटनांचा पोलिसांनी यशस्वी उलगडा केला आहे. या कारवाईत अल्पवयीन मुलांकडून चोरीचा माल खरेदी करणाऱ्या भंगार व्यावसायिकासह काही आरोपींना अटक करण्यात आली आहे.



पहिल्या घटनेत १३ मार्च रोजी डायनामिक्स कंपनीच्या परिसरातून सोलर प्लांटला जोडलेली सुमारे १५ हजार रुपये किमतीची कॉपर केबल चोरीला गेली होती. याबाबत १६ मार्च रोजी बारामती तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. तपासादरम्यान पोलिसांनी गोपनीय माहितीच्या आधारे दोन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी चोरी केल्याची कबुली दिली.

या मुलांनी चोरीचा माल भंगार व्यावसायिक मोहम्मद शब्बीर मोहम्मद बशीर अन्सारी (वय ३८) याला विकल्याचे समोर आले. पोलिसांनी अन्सारी याला अटक करून त्याच्याकडून १३ किलो तांब्याची तार जप्त केली. अल्पवयीन मुलांना बाल न्याय मंडळासमोर हजर राहण्याची नोटीस देण्यात आली आहे.

दुसऱ्या घटनेत ३ मार्च रोजी हिरकणी रियल इस्टेट प्रा. लि. यांच्या गोदामातून सुमारे ६,०५,००० रुपये किमतीचा माल चोरीस गेला होता. यामध्ये इलेक्ट्रिकल केबल, पाण्याचे फिटिंग साहित्य, आरओ आणि तांब्याच्या तारा तसेच ट्रान्सफॉर्मर ऑईलचा समावेश आहे.

याप्रकरणीमच्छिंद्रप्रदीपगव्हाळे, राजू रामा दिवटे, संजय रामा दिवटे आणि सनी भारत पाथरकर यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यापैकी राजू रामा दिवटे आणि संजय रामा दिवटे यांना ५ मार्च रोजी अटक करण्यात आली असून न्यायालयाने त्यांना २ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली होती. या प्रकरणात चोरीचा मुद्देमाल हस्तगत करण्याचे काम सुरू आहे. दोन्ही प्रकरणांचा पुढील तपास पोलीस हवालदार किशोर वीर आणि राहुल मखरे हे पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांच्या मार्गदर्शनाखाली करत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय अधिकारी सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. तसेच पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव, पोलीस अंमलदार सुरेंद्र वाघ, भारत खारतोडे, किशोर वीर, राहुल मखरे, जितेंद्र शिंदे, मनोज पवार, राहुल लांडगे, सचिन तरंगे आणि आफरीन शेख यांनी या कारवाईत सहभाग घेतला.